IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# लोकसाहित्यातून आलेली स्त्री गीते

**सहा. प्रा. सौ. स्वाती नवनाथ पवार**
**M. A. B.Ed (मराठी विभाग)**
**एम. एम. जगताप महाविद्यालय, महाड-रायगड**

**गोषवारा.....**

मराठी लोकसाहित्यात स्त्री गीते विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. या स्त्री गीतातून व काही लोककथातून स्त्री जीवनाचे भावस्पर्शी चित्र आपणास पहावयास मिळते. स्त्री  मनातील विविध भाऊ छटा मोहक असून त्यात कधी जिव्हाळा भरलेला असतो. तर कधी देवदेवतांविषयीची श्रद्धा भारावून टाकते. स्त्री जीवनाच्या विविध छटा लोकसहित त्यातून पहावयास मिळतात.

**प्रस्तावना..**

मराठी लोकगीताच्या निर्मितीमध्ये पुरुषांच्या पेक्षा स्त्रियांचा सहभाग अधिक आहे. मराठी लोकगीतात स्त्री जीवनाचा आविष्कार करणारी लोकगीतांची संख्या विपुल आहे. लोकसाहित्यात लोकसंस्कृतीचे निखळ प्रतिबिंब  पडलेले असून त्यात लोकजीवनाचा प्रवास व त्यातील महत्त्वाचे टप्पे लक्षात येतात. महाराष्ट्रीयन स्त्रियांनी स्वतःच्या भावना व्यक्त करणारे मोठ्या प्रमाणात अभिजात वाङ्‌मय निर्माण केले आहे. त्यात लोकगीते, लोककथागीते, ओवी, पाळणे ,खेळगाणे, डोहाळे अशा विविध विषयांवर गीते निर्माण केली आहे असंख्य अनामिक स्त्रियांनी लिहिलेली आहेत. ओवी ही रचना स्त्रियांची खास निर्मिती असून ती गेय आहे. स्त्री गीतातील जीवनातील निरनिराळया व्यक्तींच्या भाव संबंधाचे अत्यंत हळुवारपणे चित्रड आले आहे. संसारातील सुखदुःखाच्या उत्कट अविष्कारांमुळे स्त्रियांची ओवी गीते भाव संपन्न झाली आहे त्यात त्यांनीच आपला आत्मवृत्त जिवंतपणा आणला आहे.

समाज आणि साहित्य यांचा परस्पर संबंध असतो. साहित्यात समाज जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते, तर समाजजीवनातून लोकसाहित्य आकाराला येते. लोकसाहित्य म्हणजे पारंपरिक लोकजीवनपद्धती, लोकमानसाची अभिव्यक्ती, लोक श्रद्धा ,लोकसमजुती, लोकभ्रम, लोकरूढी ,लोकविधी, परंपरेने चालत आलेल्या प्रथा इ. बाबींचा समावेश लोकसाहित्यात होतो. मौखिक रूपातील शब्द अविष्कारात लोककथा, लोककथागीते, लोकगीते आणि उखाणे म्हणे यांचा समावेश होतो. या शब्द अविष्कारात प्रत्यक्ष शतकांची परंपरा असल्याने त्याचे स्वरूप हे चल असते. लयबद्ध मौखिक रूपातील शब्द अविष्कार म्हणजे लोकगीते. लोकगीतात स्त्री गीतांचा बराच मोठा साठा

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

आहे. लोकगीतांचे जतन करण्याचे मौलिक कार्य स्त्रियांनी केले आहे. स्त्रियांनी मौलिक रूपात निर्माण केलेली रचलेली आणि परिचित असलेली लोकगीते म्हणजे स्त्री गीते. या स्त्री गीतांना सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभली आहे.

बीज शब्द--- लोक, लोकसाहित्य, समाज संस्कृती, परंपरा ,अभ्यासक.

**सण-समारंभ- उत्सवाची लोकगीते----**

वास्तव भावसंस्कृतीचे ग्रामीण भागातील लोक जीवनावरून प्रतीत होते. त्यातही सण समारंभाच्या निमित्ताने असलेली लोकगीते अतिशय मार्मिक, सुरेख, भावनिकतिचे दर्शन घडवणारी संपन्न लोकगीते आहेत. सण-उत्सव आधी प्रसंगी एकत्र येऊन आपल्या जीवनातील आनंद लुटणारी स्त्री लोकसाहित्यात पहावयास मिळते. गौरी गणपतीच्या सणांच्या दिवशी तर स्त्रीच्या आनंदाला पारावरच उरत नाही. आपल्या मैत्रिणी सोबत फेऱ्याची गाणी म्हणण्यात मग्न असलेली स्त्री म्हणजे  लोकसाहित्याचा एक दागिनाच होय.

देगनदीवाटमला

गीतगातेपाखरू

गणपतीच्यासणाला

गौराईआलीपाहुणे

दीडदिवसराहिली

भाजीभाकरजेवली

पोरीसंगखेळली

पोरीसंगखेळताना

स्त्री ही जात्याच हळव्या मनाची, श्रद्धाळू वृत्तीची आणि संवेदनक्षम मनाची असल्यामुळे दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटना, येणारे अनुभव, कौटुंबिक नाती आणि सभोवतालचा परिसर यांचे संस्कार तिच्या मन:पटलावर उमटणे सहाजिकच आहे. स्त्री जीवनाचे भावविश्व विविध भावछटांनी नटलेले आहे. सुख-दुःख; राग- लोभ, वात्सल्य, स्नेह आधी मानवी भावनांचा हृदय आविष्कार लोकसाहित्यातून झालेला आहे.

स्त्री जीवनात मांगल्य, पावित्र्य आणि श्रद्धा यांना विशेष महत्त्व आहे. या जीवन मूल्यांची जोपासना जिवापाड करणारी स्त्री देवाधर्मावर या स्त्रीची नितांत श्रद्धा आहे. या श्रद्धेच्या आधारेच आपल्या संसारातील

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 5.731

Volume 2, Issue 7, January 2022

सुखदुःखे ती अगदी शांतपणे सहन करते.या सर्व गीतांमधून लोकशिक्षण, सहनशील वृत्ती ,आत्मविश्वास या सर्वांचे दर्शन होते.

बारावर्षेझाली

आठवणयेतेमाहेराची

शिवल्याआंब्यापासून

गावदिसतोमाहेराचा,

थोरलाबंधूबोले'

ताई' येतेपाहुणे

धाकटाबंधूबोले

कोण्यागावाचीपाहुणे

थोरलाबंधूबोले

तुझीओळखकशीगेली

थोरलाबंधूबोले

ताईलाआणकीगपाणी

गेलेहोतेविहिरीवरी

पाणीनाहीविहिरीमंदी

आईबापाच्याराज्यामध्ये

खाईतहोतेदूधसाई

भाऊभावजयच्याराज्यामध्ये

बसायलासत्तानाही.

या स्त्री गीतातून वैयक्तिक सुखदुःख आणि नातेसंबंध, नणंद भावजय मधील विरोधभक्ती याचे मार्मिक दर्शन घडताना दिसते.

Copyright to IJARSCT

स्त्री जीवन सोज्वळ, सात्विक, आणि श्रद्धाशील आहे. हे स्त्री जीवन मानवी मनाला भारावून टाकणारे आणि अलौकिक पातळीवर नेणारे असेच आहे. आई-वडिलांच्या मायेने आणि भावाच्या, बहिणीच्या प्रेमाने ओथंबून निघालेले स्त्री जीवनाचे दर्शन लोकसाहित्यातून पहावयास मिळते.

मैदान मधी मैदान तिलोरीचा मैदान मधी मैदान तिलोरीचा

मायामध्येमायाआईची

लोभामधीलोभबाबांचा

ओवीमधीओवीबहिणीची

बाजूमध्येबाजूबंधवाचीफुलांमध्येफुलजाईचे

दुधामध्येदूधगाईचे

सर्वातप्रेमआईचे

अशाप्रकारे लोकसाहित्यात ढोबळमानाने स्त्री गीते येतात. मराठी साहित्यात स्त्री गीतांची संख्या फार मोठी आहे किंबहुना लोकसाहित्याचे जतन स्त्रियांकडून झालेले आहे हे नाकारता येत नाही.

**निष्कर्ष....**

लोकजीवनाच्या भाव विश्वातून अभिव्यक्त झालेली स्त्रियांची  गीते वाङ्मयीन मूल्यांनी संपन्न झालेली आहेत. त्यातून भाषेच्या माधुरी या बरोबरच सौंदर्याचे दर्शन घडते. मराठी स्त्री गीतांच्या बाबतीत तर त्यातील गोडवा आणि रसाळपणा इतरत्र क्वचितच सापडेल या स्त्री गीतातील प्रतिमा दृष्टी मनोहरी असल्याचे प्रत्ययास येते. थोर कवीच्या काव्यात आढळणारी वाङ्मयीन मूल्ये या स्त्री गीतात आढळतात.

**संदर्भ ग्रंथ..**

[1].लोकसाहित्य:- शोध आणि बोध रा.ची .ढेरे -श्री विद्या प्रकाशन 1990

[2].लोकसाहित्य व लोकपरंपरा- संपादक डॉक्टर र. ना वरखेडे विद्या बालम ,प्रकाशन धुळे 1993

[3].लोकसंस्कृतीचे उपासक रा.ची. ढेरे -पद्मगंधा प्रकाशन 1996 सरोजिनी बाबर -जनलोकांचा सामवेद

[4].सरोजिनी बाबर- लोकसंगीत लोकसाहित्याचे स्वरूप डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद .

[5].लोकसाहित्याचे अंत: प्रवाह- डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद.